# आमदार रवींद्र धंगेकरही ‘लाडकी बहीण’च्या प्रेमात!

## कसबा विधानसभा मतदारसंघात धंगेकरांकडून नोंदणी सुरू

**लोकसत्ता प्रतिनिधी**




**पुणे :** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील महिला वर्गाला खूष करण्यासाठी ‘मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण’ योजना राबविण्यात येत असल्याची टीका विरोधकांकडून होत असली तरी, या योजनेची काँग्रेसचे कसबा विधानसभा मतदारसंघाचे आमदार रवींद्र धंगेकर हे या महत्त्वाकांक्षी योजनेच्या प्रेमात पडले आहेत.

राज्याचे अर्थमंत्री अजित पवार यांनी राज्याच्या अर्थसंकल्पात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना प्रस्तावित केली आहे. या योजनेअंतर्गत महिलांना दरमहा १ हजार ५०० रुपये दिले जाणार आहेत. मध्य प्रदेशच्या धर्तीवर ही योजना राबविण्यात येणार असून विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपला लाडके भाऊ-बहीण आठवू लागले आहेत. कर्जाच्या खाईत असलेल्या राज्याच्या तिजोरीत यासाठी पैसे नाहीत, अशी टीका काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून करण्यात आली आहे. सध्या या योजनेसाठी महायुतीच्या पदाधिकाऱ्यांकडून नोंदणी सुरू करण्यात आली असून त्याला महिलांचा मोठा प्रतिसाद मिळत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर कसब्याचे काँग्रेसचे आमदार रवींद्र धंगेकर यांनीही आगामी विधानसभा निवडणूक लक्षात घेत या योजनेसाठीची नोंदणी सुरू केली असून कसबा विधानसभा मतदारसंघात त्यासंदर्भातील फलक त्यांनी लावले आहेत.

काँग्रेसमध्ये असूनही कधी शिवसेना कार्यकर्त्याच्या, तर कधी ‘मनसे’ शैलीप्रमाणे ‘खळ्ळखट्याक’च्या भूमिकेत धंगेकर वावरत असल्याची काँग्रेस कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांची तक्रार आहे. अयोध्या येथील प्रभू श्री राम मंदिराच्या उद्घाटनापूर्वीही धंगेकर यांनी कसबा विधानसभा मतदारसंघात श्री राम आरतीचे कार्यक्रम घेतले होते. तसेच कारसेवकांचा सन्मानही त्यांनी केला होता. त्यांची ही भूमिका काँग्रेसच्या विचारधारे विरोधात असल्याची तक्रार करत काही काँग्रेस कार्यकर्त्यांनी त्याबाबत उघड नाराजी व्यक्त केली होती.

गेल्या वर्षी झालेल्या कसबा विधानसभा पोटनिवडणुकीत धंगेकर यांनी विजय मिळविला होता. मात्र त्यानंतर झालेल्या लोकसभा निवडणुकीत त्यांना पराभव स्वीकारावा लागला होता. आगामी विधासनभा निवडणुकीसाठी काँग्रेसकडून कसबा विधानसभा मतदारसंघातून त्यांची प्रबळ दावेदारी आहे. लोकसभेतील पराभवाच्या पार्श्वभूमीवर विधानसभा निवडणुकीत भाजपला त्यांच्याच बालेकिल्ल्यात पुन्हा धक्का देण्यासाठी धंगेकर यांनी ही योजना राबविण्याचा निर्णय घेतल्याचेही बोलले जात आहे. त्यासाठीचे फलक त्यांनी विविध ठिकाणी लावले आहेत.

# सारसबागेत नमाज पठण करणाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** सारसबागेमध्ये नमाज पठण केल्याप्रकरणी पाच ते सहा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ५ मे २०२२ रोजी सायंकाळी साडेसहाच्या सुमारास हा प्रकार घडला होता.

याप्रकरणी स्वारगेट पोलीस ठाण्यातील हवालदार संदीप गोडसे यांनी तक्रार दिली होती. पाच ते सहा अज्ञात व्यक्तींविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ‘पुणे महापालिकेच्या ताब्यात असलेल्या सारसबागेत ५ मे रोजी पाच ते सहा व्यक्तींनी प्रवेश केला. त्यानंतर महापालिकेच्या आदेशाचे उल्लंघन करून सारसबागेतील गणपती मंदिराच्या पाठीमागे असलेल्या हिरवळीवर त्यांनी नमाज पठण केले.

‘घटना दोन वर्षांपूर्वीची असली, तरी त्याची चित्रफीत समाजमाध्यमांवर प्रसारित होत असून, ती निदर्शनास आणून दिल्यानंतर गुन्हा दाखल झाला आहे,’ असे या प्रकरणाचा तपास करणारे सहायक पोलीस निरीक्षक संदे यांनी सांगितले.

**Shikshan Maharshi Dr.D.Y.Patil Shikshan Sanstha’s**
**Dr.D.Y.Patil Centre for Management & Research**
(Approved By AICTE, Affiliated to Savitribai Phule Pune University & Recognized By Government of Maharashtra)
Gat No 1029, 1030,Newale Wasti ,Chikhali ,Pune-411062
**Website : www.dypatilmba.com, E-mail : info@dypatilsanstha.com**

**• APPOINTMENT •**

Applications are invited from eligible candidates for the Following posts

| Department | Post | | Qualification & Pay Scale |
|---|---|---|---|
| MBA | Associate Professor | 02 | As per norms of AICTE & Savitribai Phule Pune University |
| | Assistant Professor | 03 | |
| MCA | Professor | 01 | |
| | Associate Professor | 03 | |
| | Assistant Professor | 02 | |
| MBA & MCA | Receptionist Cum Office Clerk | 01 | Female Candidate Only |

Eligible Candidates are requested to send their applications with attested photocopy of relevant certificates. Within 7 days on the above mail address.

**Dr.Sunil S. Dhanawade**
**Director**
**DYPCMR**

**Mr.Abhay B.kotkar-Patil**
**President**
**SMDYPSS**




# विशेष सरकारी वकील म्हणून शिशिर हिरे यांची नियुक्ती

## कल्याणीनगर अपघात प्रकरण

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** कल्याणीनगर पोर्श मोटार अपघात प्रकरणात विशेष सरकारी वकील म्हणून ज्येष्ठ वकील शिशिर हिरे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यानंतर या प्रकरणात मोटारचालक अल्पवयीन मुलाच्या रक्ताचे नमुने बदलून पुरावे नष्ट केल्याप्रकरणात मध्यस्थ असलेले अश्पाक मकानदार आणि अमर गायकवाड या दोन आरोपींच्या ओळख परेड चाचणीसाठी विशेष सरकारी वकील हिरे यांनी न्यायालयात शुक्रवारी अर्ज केला आहे. तर या प्रकरणात आरोपींवर भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम आठ व बारा आणि भारतीय दंडसंहितेच्या कलम १०९ व ३४ प्रमाणे कलमवाढ करण्यासाठी पोलिसांनी न्यायालयात अर्ज केला आहे.

कल्याणीनगर अपघाताच्या घटनेनंतर अल्पवयीन मुलाची वैद्यकीय तपासणी करण्यापूर्वी त्याच्या रक्ताचे नमुने बदलून पुरावा नष्ट करण्यासाठी अगरवाल दाम्पत्य आणि अश्पाक मकानदार यांच्यामध्ये एक महत्त्वाची बैठक झाली होती. आरोपी मकानदार हा रक्ताचे नमुने बदललेल्या ठिकाणासह ससून रुग्णालय, येरवडा पोलीस ठाणे आणि बाल न्याय मंडळ येथे हजर असल्याचे सीसीटीव्ही चित्रीकरण आणि साक्षीदारांकडे केलेल्या चौकशीत आढळून आले होते. रक्ताचे नमुने बदलून पुरावा नष्ट करण्याकरिता डॉक्टरांना देण्यासाठी मकानदार याने घेतलेल्या चार लाख रुपयांपैकी तीन लाख रुपये डॉ. श्रीहरी हाळनोरकडून जप्त करण्यात आले. परंतु, उर्वरित एक लाख रुपये कोणाला दिले हे अद्याप समोर आलेले नाही. या प्रकरणात न्यायालयाने सर्व आरोपींची रवानगी कारागृहात केली आहे.

दरम्यान, डॉ. अजय तावरे, डॉ. श्रीहरी हाळनोर, विशाल अगरवाल, शिवानी अगरवाल आणि अमर गायकवाड यांनी जामिनासाठी न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. अश्पाक मकानदार याने २७ जून रोजी जामीन अर्ज मागे घेतला होता. मात्र, पुन्हा त्याने न्यायालयात जामिनासाठी अर्ज केला आहे. शुक्रवारी आरोपींच्या जामीन अर्जावर सुनावणी झाली. मात्र, विशेष सरकारी वकील शिशिर हिरे यांनी या प्रकरणात आरोपींची ओळख परेड चाचणी करण्यासाठी शुक्रवारी केलेल्या अर्जास न्यायालयाने मंजुरी दिली आहे. तर, भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम आठ व बारा आणि भारतीय दंड संहितेच्या कलम १०९ व ३४ प्रमाणे कलमवाढ करण्यासाठी पोलिसांनी न्यायालयात अर्ज केला आहे. तसेच विशाल अग्रवाल आणि अश्पाक मकानदार यांच्या जामीन अर्जावर लेखी म्हणणे सादर करण्यासाठी तपास अधिकारी गणेश इंगळे यांनी मुदतवाढ मागितली आहे.

**जीपी पारसिक सहकारी बँक लि.**
(मल्टी-स्टेट शेड्युल्ड बँक)

**सहकारमूर्ती गोपीनाथ शिवराम पाटील भवन, पारसिक नगर, कळवा, ठाणे - ४००६०५**

**जाहीर आवाहन**

**विषय : बँकेचे किमान २० भाग धारण करणेबाबत**

जीपी पारसिक बँकेच्या सभासदांना कळविण्यात येते की, बँकेच्या उपविधी क्रमांक 11 a (ii) नुसार प्रत्येक सर्वसाधारण सभासदाने किमान भाग रक्कम रु. १,०००/- धारण करणे आवश्यक आहे.

ज्या सभासदांनी आजपर्यंत किमान रु. १,०००/- पर्यंत आपले भागभांडवल धारण केले नसेल त्यांना या जाहीर आवाहनाद्वारे विनंती करण्यात येते की कृपया आपण उर्वरीत रकमेचा भरणा त्वरीत करून आपल्या समभागाची किमान रक्कम रु. १,०००/- करावी.

सदर बाबतीत संबंधित सभासदांना बँकेने वेळोवेळी पत्रव्यवहार, एस.एम.एस, बँकेच्या अहवालाद्वारे, शाखेतील सूचना फलकाद्वारे सभासदांना आवाहन करण्यात आले.

यासाठी आपल्या नजिकच्या शाखेत त्वरीत संपर्क साधावा ही नम्र विनंती.

**मुख्य कार्यकारी अधिकारी.**

**NCRD'S STERLING INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES**
Plot No. 93/93A, Sector-19, Nerul (East), Navi Mumbai.

**UNAIDED**
APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FROM THE ACADEMIC YEAR 2024-25

**MMS**

| Sr. No | Cadre | Total No. of Posts | Post Reserved for OPEN | SC | ST | DT (A) | OBC | SEBC | EWS |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Associate Professor | 02 | - | 01 | - | 01 | - | - | - |
| 2 | Assistant Professor | 06 | - | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 01 |
| 3 | Librarian | 01 | 01 | - | - | - | - | - | - |

**MCA**

| Sr. No | Cadre | Total No. of Posts | Post Reserved for OPEN | SC | ST | DT (A) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Professor | 01 | 01 | - | - | - |
| 2 | Associate Professor | 02 | - | 01SC/ST | | 01 |
| 3 | Assistant Professor | 03 | - | 01 | 01 | 01 |

The posts reserved for the Backward Class candidates will be filled in by backward category candidates (Domicile of State of Maharashtra) belonging to that particular category only.

Reservation for women will be as **per University Circular No. BCC/16/74/1998 dated 10th March,1998. 4% reservation shall be for the persons with disability as per University Circular No. Special Cell/ICC/2019-20/05 dated 05th July, 2019.**

Candidates having knowledge of Marathi will be preferred.

The Educational Qualification, Experience & pay-scale for the post of Professor, Associate Professor, Assistant Professor & Librarian are as prescribed by the University of Mumbai, AICTE & DTE from time to time.

Please refer University Circular No. माशिमाक/विशिमाक /तंत्रशिक्षण/११/२०२०-२०२१ दि.११ जानेवारी २०२१ for qualifications and experience at the time of interview.

Applicants who are already employed must send their applications through proper channel.

Applicants are required to account for break, if any in their Academic Career.

Applications with full details should reach the **SECRETARY, NCRD'S STERLING INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES, Plot No. 93/93A, Sector-19, Nerul (East), Navi Mumbai - 400706.** within 15 days from the date of publication of this advertisement. This is University approved advertisement.

Sd/-
SECRETARY

# खडकवासला धरण निम्मे भरले

## धरणांच्या पाणलोट क्षेत्रात दिवसभर संततधार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** खडकवासला धरणसाखळी प्रकल्पातील चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात दिवसभर संततधार कायम होती. धरणांच्या परिसरात पाऊस कायम असल्याने चारही धरणांत मिळून एकूण आठ अब्ज घनफूट (टीएमसी) म्हणजेच २७.४६ टक्के पाणीसाठा जमा झाला आहे. प्रमुख चार धरणांपैकी खडकवासला हे धरण निम्मे भरले आहे.

शहराला टेमघर, वरसगाव, पानशेत आणि खडकवासला या चार धरणांमधून प्रामुख्याने पाणीपुरवठा केला जातो. गेल्या वर्षी धरणांच्या परिसरात सरासरीपेक्षा कमी पाऊस झाला होता. त्यामुळे या चारही धरणांत समाधानकारक पाणीसाठा जमा झाला नव्हता. त्यामुळे यंदा पुणेकरांवर पाणीकपातीची टांगती तलवार होती. यंदा धरणांमध्ये कमी पाणीसाठा, कडक उन्हाळा, पाणीचोरी, गळती, बाष्पीभवन, पाण्याची वाढती मागणी अशा विविध कारणांमुळे धरणांमधील पाणीसाठा झपाट्याने कमी झाला होता. गेल्या वर्षीप्रमाणेच यंदा जून महिन्यात धरणांच्या परिसरात दमदार पावसाची प्रतीक्षा होती. मात्र धरणपरीक्षेत्रात जुलै महिन्यात पावसाला सुरुवात झाली असून जोरदार नसला, तरी धरणांच्या परिसरात गेल्या काही दिवसांपासून पाऊस हजेरी लावत आहे. परिणामी धरणातील पाणीसाठा हळूहळू वाढत आहे. दिवसभरात टेमघर धरणक्षेत्रात ३४ मिलिमीटर, वरसगाव धरण परिसरात २३ मि.मी., पानशेत धरणक्षेत्रात २४ मि.मी., तर खडकवासला धरण परिसरात दोन मि.मी. पावसाची नोंद करण्यात आली, असे जलसंपदा विभागाकडून सांगण्यात आले.

दरम्यान, सध्या टेमघर धरणात ०.७२ टीएमसी (१९.४६ टक्के), वरसगाव धरणात २.६५ टीएमसी (२०.६४ टक्के), पानशेत धरणात ३.६४ टीएमसी (३४.१६ टक्के) आणि खडकवासला धरणात १.०० टीएमसी (५०.६३ टक्के) पाणीसाठा जमा झाला आहे.

**बजाज फायनान्स लिमिटेड**
CIN-L65910MH1987PLC042961
**नोंदणीकृत कार्यालयः** आकुर्डी, पुणे -४११०३५
कॉर्पोरेट कार्यालयः ४ था मजला, बजाज फिनसर्व्ह कॉर्पोरेट कार्यालय, पुणे-अहमदनगर रोड लगत, विमान नगर, पुणे - ४११०१४

**मुदत ठेव योजना**

CRISIL AAA/स्टेबल आणि (ICRA)AAA (स्टेबल) रेटिंग
या योजनेसाठी उपरोक्त रेटिंग हे, वेळच्या वेळी व्याज व मुद्दल यांचे पेमेंट केले जाण्याच्या संदर्भात सुरक्षिततेचे सर्वोच्च मानांकन दर्शवतात.

**₹५ कोटी पर्यंतच्या ठेवींसाठी वार्षिक व्याजदर (१६ जुलै २०२४ पासून लागू) वैध आहे.**
नवीन ग्राहकांसाठी:

तक्ता १

| बजाज फायनान्स डिजिटल एफडी (फक्त ॲप आणि वेबवर उपलब्ध) | संचयी: मुदत पुर्तीला | बिगर- संचयी: मासिक | त्रैमासिक | सहामाही | वार्षिक |
|---|---|---|---|---|---|
| ४२ महिने | ८.४०% | ८.०९% | ८.१५% | ८.२३% | ८.४०% |

तक्ता २

| विशेष कालावधी | संचयी: मुदत पुर्तीला | बिगर- संचयी: मासिक | त्रैमासिक | सहामाही | वार्षिक |
|---|---|---|---|---|---|
| १८ महिने | ७.८०% | ७.५३% | ७.५८% | ७.६५% | ७.८०% |
| २२ महिने | ७.९०% | ७.६३% | ७.६८% | ७.७५% | ७.९०% |
| ३३ महिने | ८.१०% | ७.८१% | ७.८७% | ७.९४% | ८.१०% |
| ४४ महिने | ८.२५% | ७.९५% | ८.०१% | ८.०९% | ८.२५% |

तक्ता ३

| नियमित कालावधी | संचयी: मुदत पुर्तीला | बिगर- संचयी: मासिक | त्रैमासिक | सहामाही | वार्षिक |
|---|---|---|---|---|---|
| १२ - १४ महिने | ७.४०% | ७.१६% | ७.२०% | ७.२७% | ७.४०% |
| १५ - २३ महिने | ७.५०% | ७.२५% | ७.३०% | ७.३६% | ७.५०% |
| २४ - ३५ महिने | ७.८०% | ७.५३% | ७.५८% | ७.६५% | ७.८०% |
| ३६ - ६० महिने | ८.१०% | ७.८१% | ७.८७% | ७.९४% | ८.१०% |

क) ठेवीचा किमान आकार हा ₹१५,०००/- राहिल.
ख) ड(२) मध्ये दिलेल्या गावांमधून आलेल्या ठेवींसाठी किमान आकार ₹५०००/- आहे. (ऑनलाईन गुंतवणुकीस पात्र नाही)
ग) तक्ता १ मधील व्याजदर फक्त वेबसाइट आणि अॅपद्वारे करण्यात येणाऱ्या ठेवींसाठी लागू आहेत. वेबसाइट आणि अॅप तसेच प्रत्यक्ष अर्जाद्वारे करण्यात येणाऱ्या ठेवींसाठी तक्ता २ आणि ३ मधील व्याजदर लागू आहेत.
घ) वैयक्तिक ठेविदार किंवा प्राथमिक ठेविदार, ज्येष्ठ नागरिकांच्या विशेष श्रेणीत (म्हणजे ६० वर्षांहून अधिक वयाच्या व्यक्ति, वयाच्या पुराव्याच्या तरतूदीच्या अधीन) वार्षिक ०.४०% पर्यंतच्या दराने अतिरिक्त व्याजासाठी प्रती ₹५ (पाच) कोटी पर्यंतच्या रक्कमेकरिता पात्र असतील.
ड) ₹५ कोटींहून जास्त रकमेच्या प्रत्येक घाऊक ठेवीसाठी प्रकाशित झालेल्या कार्ड दराहून व्याज दर भिन्न असू शकतो आणि रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने विनिर्दिष्ट केलेल्या व्याज दराच्या मर्यादेमध्ये प्रत्येक प्रकरणानुसार ठरवला जाईल.
च) बजाज फायनान्स लि. कडून अर्जाला एकदा मंजुरी मिळाली तर व्याज त्या दिवसापासून चालू होईल ज्या दिवसापासून (i) गुंतवणुकदाराने बजाज फायनान्स च्या अधिकृत पोर्टल किंवा आमच्याशी संलग्न भागीदाराच्या पोर्टल वरुन गुंतवणुकीचा अर्ज केला आहे, जेथे बजाज फायनान्स चे पेमेंट गेटवे वापरले आहे (ii) बजाज फायनान्स ला रक्कम मिळेल जर गुंतवणुकदाराने आमच्याशी संलग्न भागीदाराच्या पोर्टल वरुन गुंतवणुकीचा अर्ज केला आहे, जेथ संलग्न भागीदाराचे पेमेंट गेटवे वापरले आहे (iii) बजाज फायनान्स ला रक्कम मिळेल जर गुंतवणुकदाराने चेकर्किंवा कुठल्याही दुसऱ्या पद्धतीने गुंतवणुक केली आहे.
छ) परिपक्वतेच्या तारखेपूर्वी विहित कालावधीमध्ये नूतनीकरणाची विनंती प्राप्त न झाल्यास परिपक्वतेच्या तारखेला कंपनी ठेवीची रक्कम परत करेल. ठेवीच्या अर्जामध्ये ठेवीदाराने नमूद केलेल्या बँक खात्यामध्ये एनईएफटी किंवा आरटीजीएस किंवा धनादेशाने (एनईएफटी/आरटीजीएस नाकारले गेल्यास) प्रदान केले जाईल.
ज) ठेवीचे (किंवा त्यातील काही भागाचे) नूतनीकरण करण्याची विनंती ठेवीच्या परिपक्वतेच्या तारखेपूर्वी कामकाजाच्या निदान २४ तास आधी, कंपनीच्या जवळच्या शाखेला भेट देऊन किंवा टपाल, स्वतंत्र आर्थिक सल्लागार किंवा कंपनीच्या पॅनेलवरील राष्ट्रीय वितरकांकडे लेखी विनंती पाठवून केली जाऊ शकते, ज्यायोगे कंपनीला देय तारखेला प्रकरणानुसार ठेवीची (किंवा त्यातील काही भागाची) परतफेड आणि/किंवा नूतनीकरण करता येईल. वर नमूद केलेल्या कालावधीनंतर ठेवीच्या नूतनीकरणाच्या कोणत्याही विनंत्या स्वीकारल्या जाणार नाहीत. नूतनीकरणाच्या विनंतीसह सर्व ठेवीदारांनी योग्य प्रकारे भरलेला आणि स्वाक्षरी केलेला ठेवीच्या अर्जाचा फॉर्म असणे आवश्यक आहे. ठेवीचे नूतनीकरण हे नूतनीकरणाच्या तारखेला असलेल्या व्याज दर आणि इतर अटी आणि शर्तींनुसार होईल. ठेवींच्या नूतनीकरणाच्या वेळी विद्यमान ठेवीचा एफडीआर आवश्यक नसेल कारण परिपक्वतेच्या तारखेनंतर तो रद्दबातल होईल.
झ) जर ग्राहकाने अर्जाद्वारे नूतनीकरणाचा पर्याय निवडला असेल परंतु त्यानंतर त्याला नूतनीकरण करायचे नसेल तर त्यासंबंधीचा लिखित अर्ज कंपनीकडे नूतनीकरण तारखेच्या कमीत कमी ३ दिवस आधी पोहोचला पाहिजे. हा अर्ज सर्वात जवळच्या कंपनी शाखेत जाऊन किंवा टपालाने, स्वतंत्र अर्थविषयक सल्लागारांद्वारे किंवा कंपनीच्या पॅनेलवरील राष्ट्रीय वितरकांकडे देता येईल. मुदत पूर्तीच्या दिवसानंतर आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

दुरूस्ती झालेल्या नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीज अँड मिस्लेनिअस नॉन-बँकिंग कंपनीज (जाहिरात) नियम, १९७७ नुसार द्यावयाचा तपशील.

**क. कंपनीचे नावः बजाज फायनान्स लि.**
**ख. गठित केले गेल्याचा दिनांकः 25 मार्च, 1987**
**ग. प्रॉफिटस्/डिव्हिडंडस्:**
वरील वर्षांच्या संबंधात, जाहिरातीची तारीख आणि कंपनीद्वारे घोषित लाभांशाच्या तत्काळ आधीच्या तीन आर्थिक वर्षांसाठी, कराची तरतुद करण्याआधी व नंतर कंपनीचा नफा.

(₹ कोटींमध्ये)

| आर्थिक वर्ष रोजी संपले | नफा (स्टँडअलोन) कर-पूर्व | कर-पश्चात | लाभांश % |
|---|---|---|---|
| ३१.०३.२०२१ | ५,३६२.८८ | ३,९५५.५१ | ५०० |
| ३१.०३.२०२२ | ८,५८६.३९ | ६,३५०.४९ | १००० |
| ३१.०३.२०२३ | १३,८११.५१ | १०,२८९.७४ | १५०० |

**घ ड. कंपनीच्या व्यवस्थापनाचा थोडक्यात तपशीलः**
संचालक मंडळाचे नियंत्रण व देखरेख यांच्या अधीन राहून व्यवस्थापकीय संचालक कंपनीचे व्यवस्थापन पाहतात. कंपनीचा व्यापार-उदीम आणि इतर बाबी यांच्या व्यवस्थापनासाठी व्यवस्थापकीय संचालकाना आवश्यक ते अधिकार प्रदान केलेले आहेत.

**च. संचालकांची नावे, पत्ते आणि व्यवसायः**

| नाव | पत्ता | व्यवसाय |
|---|---|---|
| श्री. संजीव बजाज (अध्यक्ष) | बंगला क्र.४, बजाज विहार कॉलनी, बजाज ऑटो लि. कॉम्प्लेक्स, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे - ४११०३५. | उद्योगपती |
| श्री. राजीव जैन, (व्यवस्थापकीय संचालक) | डी-२, आयव्ही ग्लेन, मॅरीगोल्ड प्रिमायसेस, कल्याणी नगर, पुणे - ४११०१४. | नोकरी |
| श्री. राजीव बजाज | ३४/३५, योग कोरेगाव पार्क, लेन क्र. २, पुणे - ४११०३५. | उद्योगपती |
| डॉ नौशाद फोर्ब्स | ७४ कोरेगाव पार्क, लेन क्र.३, पुणे - ४११ ००१. | व्यवसाय |
| श्री अनामी नारायण रॉय | ६२ सागर तरंग, खान अब्दुल गफार खान रोड, वरळी सी फेस, मुंबई -४०० ०३०. | सेवानिवृत्त सनदी सेवक |
| श्री प्रमीत झवेरी | २१ सी, वूडलँड्स, पेडर रोड, मुंबई - ४०० ०२६. | व्यवसाय |
| श्रीमती राधिका हरिभक्ती | ५१, मेकर टॉवर बी, कफ परेड, मुंबई - ४०० ००५. | आर्थिक सल्लागार / व्यावसायिक संचालक |
| डॉ. अरिंदम भट्टाचार्य | एल१/४, २रा मजला, हौस खाझ, नवी दिल्ली - ११००१६. | व्यावसायिक |
| श्री. अनुप कुमार साहा (उप-व्यवस्थापकीय संचालक) | डी१/३०२, १३वा मजला, इऑन वॉटरफ्रन्ट, इऑन आयटी पार्कच्या शेजारी, खरडी, पुणे - ४११ ०१४. | नोकरी |

**च. सर्वात अलिकडच्या दोन लेखा-परिक्षित बॅलन्स-शीटमध्ये दिसणारा कंपनीचा (स्टँडअलोन) आर्थिक स्थिती सारांश**

(₹ कोटींमध्ये)

| | ३१ मार्च २०२३ रोजी | ३१ मार्च २०२२ रोजी |
|---|---|---|
| **मालमत्ता** | | |
| **आर्थिक मालमत्ता** | | |
| रोख व रोख समकक्ष | १,१९१.३५ | २,८९८.६६ |
| रोख आणि रोख समकक्षांव्यतिरिक्त बँक बॅलन्स | २,१२८.११ | २.०७ |
| व्युत्पन्न आर्थिक साधने(डेरीवेटीव्ह फायनान्शियल इंस्ट्रुमेंट्स) | १४६.९८ | १२१.९० |
| व्यापार प्राप्ती (ट्रेड रिसिव्हेबल्स) | १,०७०.२१ | १,०१७.११ |
| कर्जे | १,७९,०९७.१२ | १,४४,२७६.२५ |
| गुंतवणूकी | २८,७३७.८५ | १६,३७१.८२ |
| इतर आर्थिक मालमत्ता | ७१५.२१ | ४६४.४४ |
| **एकूण आर्थिक मालमत्ता** | **२,१३,०८६.८३** | **१,६५,१५२.२५** |
| **बिगर-आर्थिक मालमत्ता** | | |
| सध्याची कर मालमत्ता (निव्वळ) | १७५.८५ | १५८.९६ |
| स्थगित कर मालमत्ता (निव्वळ) | ९१९.०० | ९०८.४० |
| प्रॉपर्टी, प्लान्ट आणि इक्विपमेंट | १,५५१.९६ | १,१८९.७७ |
| भांडवल काम प्रगतीपथावर | १४.६० | १३.२७ |
| विकासा अंतर्गत अमूर्त मालमत्ता | ६४.९३ | १९.४१ |
| अमूर्त मालमत्ता | ५९४.९५ | ४०८.६७ |
| इतर बिगर-आर्थिक मालमत्ता | ११६.६३ | १६५.३५ |
| **एकूण बिगर-आर्थिक मालमत्ता** | **३,४३७.९२** | **२,८६३.८३** |
| **एकूण मालमत्ता** | **२,१६,५२४.७५** | **१,६८,०१६.०८** |
| **देणी व इक्विटी** | | |
| **देणी** | | |
| **आर्थिक देणी** | | |
| व्युत्पन्न आर्थिक साधने देय | - | १४०.०२ |
| व्यापार देय | | |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग यांची एकूण थकबाकी | १.७७ | - |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग वगळून इतर धनकोची (क्रेडिटर्स) एकूण थकबाकी | ९५१.४१ | ७६२.५८ |
| ईतर देय | | |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग यांची एकूण थकबाकी | ०.६५ | - |
| -छोटे उद्योग आणि लघु उद्योग वगळून इतर धनकोची (क्रेडिटर्स) एकूण थकबाकी | ५५८.४५ | ३०१.३४ |
| कर्जाच्या सिक्युरिटीज | ६५,६६९.८५ | ५९,०३४.५८ |
| उधारी (कर्ज रोखे वगळता) | ४७,८९४.७० | २९,८७०.३८ |
| ठेवी | ४४,४८९.७९ | ३०,२८९.५२ |
| उप-कर्जे | ३,६३०.२९ | ३,८४५.७७ |
| इतर आर्थिक देणी | १,१२१.५२ | ९६२.७१ |
| **एकूण आर्थिक देणी** | **१,६४,३१८.४३** | **१,२५,२०६.९०** |
| **बिगर-आर्थिक देणी** | | |
| सध्याचे कराचे देणे (निव्वळ) | १२२.७६ | ७९.३३ |
| तरतुदी | २५४.८६ | १६२.२४ |
| इतर बिगर-आर्थिक देणी | ३३५.९७ | ५११.७३ |
| **एकूण बिगर-आर्थिक देणी** | **७१३.१९** | **७५३.३०** |
| **इक्विटी** | | |
| इक्विटी शेअर भांडवल | १२०.८९ | १२०.६६ |
| इतर इक्विटी | ५१,३७२.२४ | ४१,९३५.२२ |
| **एकूण इक्विटी** | **५१,४९३.१३** | **४२,०५५.८८** |
| **एकूण देणी व इक्विटी** | **२,१६,५२४.७५** | **१,६८,०१६.०८** |

**आकस्मिक देणी (स्टँडअलोन)**

| तपशील | ३१ मार्च २०२३ रोजी | ३१ मार्च २०२२ रोजी |
|---|---|---|
| कर्ज म्हणून गणले जात नाहीत असे कंपनीविरुद्धचे विवादाचे दावे | ६३.४५ | ५२.८७ |
| अपील अंतर्गत वॅट बाबी | ४.३१ | ४.२१ |
| अपील अंतर्गत ईएसआय बाबी | ५.१४ | ५.१४ |
| हमीपत्रे दिली | २.५० | २.५० |
| अपील अंतर्गत जीएसटी / सेवा कर बाबी | | |
| - व्याज सबसिडीवर | २,१६४.०० | २,०३४.७२ |
| - गुंतवणुकीच्या क्रियाकलापावरील क्रेडिट्च्या अतिरीक्त प्रवर्तनावर | ५७३.७३ | ५४५.४७ |
| - दंडव्याज/ चार्जेस यांवर | २६५.४९ | २५१.३७ |
| - ग्राहकाने क्रेडिट नोटवर इनपुट टॅक्स क्रेडिट परत केल्यावर | ३०.४१ | - |
| - इतरांबाबत | १४.३० | १३.७३ |
| प्राप्तीकराच्या बाबीः | | |
| - कंपनीद्वारे केली गेलेली अपिल्स | १६.०९ | ९.५४ |
| - प्राप्तीकर विभागाने केलेली अपिल्स | ०.२८ | ०.२८ |

**छ. क) नॉन-बँकिंग फायनान्शियल कंपनीज ॲक्सेप्टन्स ऑफ पब्लिक डिपॉझिटस् (रिझर्व बँक) डायरेक्शन्स, २०१६ यानुसार कंपनी डिपॉझिटच्या मार्गाने उभी करू शकणारी रक्कम आहे: ६९,२२८.०२ कोटी**
**ख) प्रत्यक्षात ३१.०३.२०२३ रोजी जमलेली एकूण डिपॉझिट रक्कम खालीलप्रमाणे आहे :**
**(I) सार्वजनिक ठेवी (दावा न केलेल्या ठेवींसह): २८,३०३.९१ कोटी**
**(ii) सार्वजनिक ठेवींव्यतिरिक्त (दावा न केलेल्या ठेवींसह): १६,१८६.७२ कोटी**

**ज.** ज्यात संचालक/कंपनी यांना ठोस स्वारस्य अशा त्याच समूहातील कंपन्या किंवा इतर एन्टिटीज किंवा व्यापार-उदीमाचे प्रकल्प यांना दिलेल्या निधी किंवा बिगर-निधी स्वरुपाची एकूण येणी (ड्यूज) ही २९.३० कोटी इतकी आहेत (बजाज हौसिंग फिनान्स लिमिटेड - २.७९ कोटी, बजाज आलियान्झ लाईफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड - ४.२८ कोटी, बजाज आलियान्झ जनरल इन्शुरन्स कंपनी लिमिटेड - २.७६ कोटी, बजाज फिन्सर्व हेल्थ लिमिटेड - १०.११ कोटी, बजाज ऑटो लिमिटेड - ९.१५ कोटी, हिंद मुसाफिर एजन्सी लिमिटेड - ०.०१ कोटी, बजाज इलेक्ट्रीकल्स लिमिटेड - ०.०७ कोटी, जमनालाल सन्स प्रायव्हेट लिमिटेड - ०.१३ कोटी).

**झ.** ज्याबाबत दावा केला गेला नाही त्याशिवाय इतर कोणत्याही देण्याची वेळ टळून गेलेल्या (ओव्हरड्यू) ठेवी कंपनीकडे नाहीत.

**ञ.** कंपनी खालीलप्रमाणे घोषित करीत आहेः
I) आपल्याला लागू असलेल्या निर्देशांच्या तरतुदींचे पालन कंपनीने केलेले आहे.
ii) निर्देशांची पूर्तता होण्यामुळे, रिझर्व बँक ऑफ इंडियाने ठेवी परत देण्याची (रिपेमेंट) हमी घेतली आहे असे सूचित होत नाही
iii) कंपनीने स्वीकारलेल्या ठेवी ह्या सुरक्षित नाहीत (अनसिक्युअर्ड आहेत) आणि इतर अनसिक्युअर्ड देण्यांच्याच श्रेणीत त्या गणल्या जातात.
iv) कंपनीने विनंती केली आहे त्या ठेवींचा विमा उतरवलेला नाही.
v) अर्जाच्या प्रपत्रात प्रकट केली आहे ती कंपनीची आर्थिक स्थिती व त्यातील निवेदने ही खरी आणि अचूक आहेत. त्यातील अचूकता आणि सत्यता यासाठी कंपनी आणि तिचे संचालक मंडळ जबाबदार आहेत. कंपनीची आर्थिक कृती-कार्ये रिझर्व बँक ऑफ इंडियाद्वारे नियंत्रित केली जातात. तथापि, हे स्वच्छपणे समजून घेतलेच पाहिजे की कंपनीच्या आर्थिक भक्कमतेसाठी किंवा कोणत्याही निवेदनांच्या अचूकतेसाठी किंवा कंपनीद्वारे मांडल्या गेलेल्या भूमिका किंवा व्यक्त केलेली मते आणि ठेवी परत देण्याची / देणी चुकवण्याची कंपनीची स्थिती याबाबतची कोणतीही जबाबदारी रिजर्व बँक ऑफ इंडिया घेत नाही.

**ट.** ठेवी ह्या, अर्जाच्या प्रपत्रात दिलेल्या अटी व शर्तींच्याही अधीन राहतील.

**ठ.** रिझर्व बँक ऑफ इंडियाच्या त्या संदर्भातील नियमनांच्या अधीन राहून मुदतीच्या अंतिम दिनांकापूर्वी ठेवी काढून घेता येऊ शकतील. कृपया नोंद घ्या की मुदतीआधी ठेव काढून घेणे (मृत्यूच्या केसेसचा समावेश) हे खालील अटींच्या अधीन राहिल
क) ठेव ठेवल्याच्या दिनांकापासून ३ महिन्यांपर्यंतः प्राथमिक ठेवीदाराच्या मृत्यूची प्रकरणे वगळता, रक्कम काढण्याची परवानगी नाही.
ख) ३ महिन्यांनंतर पण ६ महिन्यांच्या आतः व्याज देय असणार नाही.
ग) ६ महिन्यांनंतर पण अंतिम मुदतीच्या दिनांकाआधीः ही योजना चालवली जात आहे त्या कालावधीदरम्यान निश्चित केल्या गेलेल्या व्याजदरापेक्षा २% व्याजदर कमी राहिल. जर ठेव कालावधीसाठी कोणताही दर निश्चित केला गेला नसल्याच्या प्रकरणी बीएफएल द्वारे देऊ केल्या गेलेल्या सर्वाधिक कमी दरापेक्षा ३% कमी व्याजदर देय राहिल.

**ड.** असल्यास, शाखांच्या किंवा एककांच्या तपशीलासह कंपनी व तिच्या उपकंपन्या चालवत असलेला व्यापार-उदीमः
१. कंपनी व तिच्या शाखा चालवत असलेला व्यापार-उदीमः
ग्राहकांना अर्थ-पुरवठा करण्याच्या श्रेणीमध्ये यांचा समावेश - वाहन-कर्ज, दीर्घ काल वापरण्याच्या वस्तूंसाठी ग्राहकांना कर्ज, वैयक्तिक कर, मालमत्ता तारण कर्ज, गृह कर्ज, बांधकाम साहित्य खरेदीसाठी कर्ज, लहान व्यवसायासाठी कर्ज, सिक्युरीटीजच्या तारणावर कर्ज आणि पायाभूत सोयी-सवलतींसाठी (इन्फ्रास्ट्रक्चर) कर्ज. कंपनीच्या शाखा येथे आहेत: आग्रा, अहमदाबाद, अहमदनगर, अजमेर, अकोला, अकोट, अलापुझ्झा, अलाहाबाद, अंबाला, अमरावती, अमरेली, अमृतसर, आणंद, अनंतपूर, आणि अंकलेश्वर, असनसोल, औरंगाबाद, बागलकोट, बंगलोर, बारामती, बार्डोली, बरेली, बडोदा, बार्शी, बेळगाव, बेल्लारी, भंडारा, भडोच, भटिंडा, भावनगर, भिलाई, भिवंडी, भोपाल, भुवनेश्वर, भूज, बिदर, विजापूर, बिकानेर, बिलासपूर, बोकारो, बोलपूर, बोरसाड, कालिकत, चाळीसगाव, चंदिगड, चंद्रपूर, चेन्नई, छिंदवाडा, चिखली, चिपळूण, चित्रदुर्ग, चित्तरंजन, चोपडा, कोचीन, कोईम्बतूर, कडलोर, कटक, दाभोई, दाहोद, दावणगेरे, डेहराडून, देवास, धनबाद, धारापुरम, धारवाड, धुळे, दिंडीगुल, दुर्गापूर, एलुरू, इरोड, गांधीधाम, गोवा, गोकाक, गुलबर्गा, गुना, गुंटूर, ग्वाल्हेर, हलदिया, हलोल, हासन, हावेरी, हिंम्मतनगर होशंगाबाद, होशियारपूर, हॉस्पेट, हुबळी, हैदराबाद, इंदूर, जबलपूर, जगधरी, जयपूर, जालंधर, जळगाव, जलपैगुडी, जम्मू, जामनगर, जामनेर, जमशेदपूर, जोदपूर, जुनागढ, कडी, कैथाल, काकीनाडा, कालका, कन्नूर, कानपूर, कपूरथळा, क-हाड, कराईकुडी, कर्नाल, करुनागापल्ली, करूर, कारवार, कटनी, खामगाव, खांडवा, खडगपूर, कोलार, कोल्हापूर, कोलकाता, कोल्लम, कोपरगाव, कोरबा, कोटा, कोट्टायम, कर्नूल, कुरुक्षेत्र, लातूर, लखनौ, लुधियाना, मच्छलीपट्टम, मदुराई, मंड्या, मंगलोर, म्हापसा, मडगाव, मेहसाणा, मोगा, मोर्वी, मुंबई, म्हैसूर, नभा, नडियाद, नागरकॉईल, नागपूर, नमक्कल, नांदेड, नंदुरबार, नाशिक, नवसारी, नेल्लोर, नवी दिल्ली, पालनपूर, पंढरपूर, पानिपत, पतियाळा, पाटणा, पेण, फगवाडा, पिंपळगाव, पोलाची, पाँडिचेरी, पुणे, पुत्तूर, रायचूर, रायपूर, राजामुंद्री, राजगुरूनगर, राजकोट, राजनांदगाव, राजपुरा, राणाघाट, रांची, रतलाम, रत्नागिरी, रेवा, रोहतक, रोपार, राऊरकेला, सालेम, सांगली, सातारा, सतना, सिहोर, सिमला, शिमोगा, सिलीगुडी, सिरसा, सोलापूर, सुरत, सुरेंद्रनगर, तेनाली, थिरुवल्ला, थिरुनेलवेल्ली, तिरुपती, थिरूपूर, त्रिचूर, त्रिची, त्रिवेंद्रम, तुमाकुरू, तुतीकोरीन, उदयपर, उडिपी, उज्जैन, वडाकारा, बलसाड, वापी, वाराणसी, विदिशा, विजयवाडा, विझाग, विजयानगरम, वणी, वारंगल, वर्धा, वरूड, वाशिम, यवतमाळ आणि www.bajajfinserv.in=> Contact us=>Visit our branch या अधिकृत संकेतस्थळ पानावर नमूद केलेल्या इतर सर्व शाखा किंवा https://www.bajajfinserv.in/branch-locator यावर थेट क्लिक करा.
२. किमान ठेव रक्कम रु.५०००/- असलेल्या जागा: (ऑनलाईन गुंतवणुकीस पात्र नाही)
अ) गुजरात - बुजेठा, काहांवा, खापरवाडा, नांदरखा, सुनेवकाला, अमाडपोर, असर्मा, दारापुरा, डुंगरी, गोदावडी, हरंगम, कोटंबी, सार्वाणी, वंस्कूई, बालडा, भाटी करंबेली, जीताली, उमरा, बर्कल, भटलाई, कण्यासी, पार्डी झंखारी, पाथरी, करमळ, हांडोद चोकडी, भडकड, देहमी, दाभासी, कंथारीया, विरोल, लिलछा, नवगम इसारी, सांगल, वानियाद, महुडी, परसा गंज, वसना राठोड, मेनपुरा, सिहुंज, वसना, वसई, दधियाल, कुडा गंज, वडवी, वरवडा.
ब) महाराष्ट्र - बारागाव पिंपरी, खर्डे, मांजरोड, जातोडा, मेहेरगाव, सोमठाणे, ओढा, वार, शहा, भातने जवखेडा, लामकानी, चिंचखेडे, शेवडे, गोंदूर, दोडी बुद्रुक, रायपूर, भाटपुरे, वरुड (महाराष्ट्र), दीघवे, वडजाई, इंदवे, विंचूर, देवभाने, देऊर बुद्रुक, पांढुर्ली
क) राजस्थान - अकोला आरजे, बदर्डा, बघेरा, भिनय, बोरज, दाबोक आरजे, दौलतपुरा, दौराई, डुंगला, गनाहेरा, गोविंदगड, हुरडा, जाहोटा, जैतपुरा, जालिया २, जटवारा, जेठाना, काडेरा, करोई कलान, कोट खवाडा, कोठिया, लालचंदपुर, मानपुरा मंचेरी, मेनार, मुहाना, नाई की थाडी, नटाटा, निवाना, राडावस, साराधाना.
३. कंपनीच्या उपकंपन्या चालवत असलेला व्यापार-उदीमः

| अ. क्र. | उपकंपनीचे नाव | नोंदणीकृत कार्यालयाचा पत्ता | कृती-कार्य |
|---|---|---|---|
| 1. | बजाज हाउसिंग फायनान्स लिमिटेड | बजाज ऑटो लि. कॉम्पलेक्स, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे -४११०३५ | हाउसिंग फायनान्स व्यापार-उदीम |
| 2. | बजाज फायनान्शियल सिक्युरिटीज लिमिटेड | बजाज ऑटो लि. कॉम्पलेक्स, मुंबई-पुणे रोड, आकुर्डी, पुणे -४११०३५ | स्टॉक ब्रोकिंग आणि डिपॉझिटरी सहभागी |

**जाहिरातीचा वरील मजकूर हा संचालक मंडळाच्या अधिकाराने व त्यांच्या नावाने जारी केला गेलेला आहे आणि संचालक मंडळाने २६ जुलै २०२३ च्या आपल्या बैठकीत या मजकुराला मान्यता दिलेली आहे आणि मंडळाने अधिकार दिलेले राजीव जैन, व्यवस्थापकीय संचालक यांनी सही केलेली त्याची एक प्रत नोंदणीसाठी रिझर्व बँक ऑफ इंडियाकडे पोहचवली गेलेली आहे.**

बजाज फायनान्स लिमिटेडसाठी
संचालक मंडळाच्या आदेशान्वये

राजीव जैन
व्यवस्थापकीय संचालक
DIN: ०१५५०१५८

पुणे
१२ जुलै २०२४

बजाज फिनसर्व्ह ॲप डाउनलोड करण्यासाठी स्कॅन करा.

**गुंतवणूक कशी करावी:**
गुंतवणूक केवळ धनादेश द्वारे, नेटबँकिंग द्वारे होऊ शकते. धनादेश द्वारे गुंतवणूक करत असल्यास Bajaj Finance Ltd. A/c 00070350006738 ह्या नावाने करावी. त्यावर 'अकाऊंट पेयी ओन्ली' असे लिहून तो क्रॉस करावा. धनादेश 'at par' देय असावा व CTS पूर्ततेचा असावा. गुंतवणूक रकमेसह अर्ज प्रपत्र ह बजाज फिनान्स च्या मुदत ठेव वितरकांकडे किंवा बजाज फिनान्स च्या कोणत्याही शाखांकडे द्यावे. नेटबँकिंग द्वारे गुंतवणूक करायची असल्यास ह्या तपशीलाचा वापर करावा: लाभार्थी नावः बजाज फिनान्स लि. मुदत ठेव संकलन खाते, बँक खाते क्र.: BFLFD8 (संख्यात्मक खाते क्र. ECMS संकलन कोड BFLFD8 ने बदलला आहे), बँक खाते प्रकार: करंट खाते, बँकेचे नाव: एचडीएफसी बँक लि., आयएफएससी: HDFC0004989, बँक शाखा: कांजुरमार्ग, मुंबई. **अधिक माहितीसाठी किंवा आमच्या वितरकांसंबंधी माहितीसाठी wecare@bajajfinserv.in वर ई-मेल करा किंवा +९१ ८६९८०१०१०१ वर फोन करा.**

अधिक माहितीसाठी आणि गुंतवणूक करण्यासाठी स्कॅन करा.

**NCRD'S STERLING INSTITUTE OF PHARMACY**
Plot No. 93/93A, Sector-19, Nerul (East), Navi Mumbai.

**UNAIDED**
APPLICATIONS ARE INVITED FOR THE FOLLOWING POSTS FROM THE ACADEMIC YEAR 2024-25

| Sr. No | Cadre | Subject | Total No. of Posts | Post Reserved for OPEN | SC | ST | DT (A) | OBC |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Professor | Pharmacology | 01 | 01 | - | - | - | - |
| | | Pharmaceutics | 01 | 01 | - | - | - | - |
| | | Pharmaceutical Chemistry | 01 | 01 | - | - | - | - |
| 2 | Associate Professor | Pharmacology | 01 | 01 | - | - | - | - |
| | | Pharmacognosy | 01 | 01 | - | - | - | - |
| | | Pharmaceutics | 01 | 01 | - | - | - | - |
| | | Pharmaceutical Chemistry | 01 | 01 | - | - | - | - |
| 3 | Assistant Professor | Pharmacology | 01 | 01 | - | - | - | - |
| | | Pharmaceutics | 04 | 01 | 01 SC/ST | | 01 | 01 |
| | | Pharmaceutical Chemistry | 03 | - | 01 SC/ST | | 01 | 01 |
| | | Pharma Analysis | 01 | 01 | - | - | - | - |
| | | Quality Assurance | 01 | 01 | - | - | - | - |
| 4 | Librarian | | 01 | - | 01 SC/ST | | - | - |

The posts for the reserved category candidates will be filled in by the same category candidates (Domicile of State of Maharashtra) belonging to that particular category only.

Reservation for women will be as per University Circular **No. BCC/16/74/1998 dated 10th March,1998. 4% reservation shall be for the persons with disability as per University Circular No. Special Cell/ICC/2019-20/05 dated 05th July, 2019.**

Candidates having knowledge of Marathi will be preferred.

**The Educational Qualification, Experience & pay-scale for the post of Professor, Associate Professor, Assistant Professor & Librarian are as prescribed by the University of Mumbai, PCI , AICTE from time to time.**

Please refer University Circular No. माशिमाक/विशिमाक /तंत्रशिक्षण/११/२०२०-२०२१ दि.११ जानेवारी २०२१ for qualifications and experience at the time of interview.

Applicants who are already employed must send their applications through proper channel.

Applicants are required to account for break, if any in their Academic Career.

Applications with full details should reach the **SECRETARY, NCRD'S STERLING INSTITUTE OF PHARMACY, Plot No. 93/93A, Sector-19, Nerul (East), Navi Mumbai - 400706.** within 15 days from the date of publication of this advertisement. This is University approved advertisement.

Sd/-
SECRETARY

# मिठाचे प्रमाण कमी करून मूत्रपिंड आजारावर उपचार

आरोग्य वार्ता

**नवी दिल्ली :** दैनंदिन आहारात मिठाचे प्रमाण कमी केल्याने मूत्रपिंडाच्या आजारापासून संरक्षण मिळू शकते, असे मत अभ्यासकांनी व्यक्त केले आहे. त्याच वेळी मिठाचे प्रमाण कमी करून मूत्रपिंडाच्या आजारावर उपचार करणे शक्य होते, असे एका संशोधनातून समोर आले आहे.

भारतात मूत्रपिंड निकामी होणे हे मृत्यूचे पाचवे कारण सांगितले जाते. २५ ते ३० वयोगटातील मूत्रपिंड रुग्णांची संख्या वाढत आहे. त्यामुळे चिंता व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, अमेरिकेत झालेल्या संशोधनामुळे मूत्रपिंडाच्या आजारावर उपचाराच्या आशा निर्माण झाल्या आहेत.

अमेरिकन शास्त्रज्ञांनी प्राण्यांवर केलेल्या अभ्यासात असे आढळून आले आहे की, अन्नातील मिठाचे प्रमाण आणि शरीरातील द्रवपदार्थांचे प्रमाण काही दिवस कमी केल्याने मूत्रपिंडातील काही पेशींची दुरुस्तीदेखील होऊ शकते.

दक्षिण कॅलिफोर्निया विद्यापीठातील केक स्कूल ऑफ मेडिसिनमधील शास्त्रज्ञांच्या टीमने केलेल्या अभ्यासात असे आढळून आले की, उंदरांमध्ये मीठ आणि शरीरातील द्रवपदार्थ कमी झाल्यामुळे मूत्रपिंडाच्या पेशींची दुरुस्ती आणि पुनरुत्पादन क्षमता वाढते. जर्नल ऑफ क्लिनिकल इन्व्हेस्टिगेशनमध्ये याबाबत अभ्यास प्रकाशित झाला आहे. सध्या मूत्रपिंडाच्या आजारावर कोणताही इलाज नाही. तोपर्यंत मूत्रपिंड इतके खराब होते की ते दुरुस्त करता येत नाही. यानंतर डायलिसिस आणि शेवटी प्रत्यारोपण हेच पर्याय उरतात.

दि कॉसमॉस को-ऑप. बँक लि. (मल्टिस्टेट शेड्यूल्ड बँक)
स्मॉल बिझनेस लोन
किफायतशीर व्याजदर 9%* (ROI p.a.) *अटी लागू
₹१ कोटीपर्यंत कर्ज उपलब्ध*
प्रोसेसिंग चार्जेस नाहीत.
Toll Free No.: 1800 233 0234




# पूजा खेडकर यांच्या आईच्या दमदाटीच्या चित्रफितीने खळबळ

## पोलिसांकडून चौकशी होणार

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** भारतीय प्रशासकीय सेवेतील (आयएएस) प्रशिक्षणार्थी पूजा खेडकर यांची आई मनोरमा खेडकर यांनी पिस्तुलाचा धाक दाखवून मुळशी तालुक्यातील शेतकऱ्यांना दमदाटी केल्याचे व्हिडिओ चित्रीकरण प्रसारित झाल्याने खळबळ उडाली. संबंधित व्हिडिओची तपासणी आणि मनोरमा यांच्याकडे पिस्तुलाचा अधिकृत परवाना आहे का, याची चौकशी पुणे ग्रामीण पोलिसांकडून केली जाणार आहे.

पूजा खेडकर यांनी खासगी मोटारीवर अंबर दिवा लावल्याप्रकरणी कारवाईसाठी गेलेल्या पोलिसांना प्रवेशद्वाराबाहेर उभे करून दमदाटी केल्याचे प्रकरण ताजे असतानाच आता समोर आलेल्या या व्हिडिओ चित्रीकरणाने पूजा यांची आई मनोरमा खेडकर यांच्या अडचणींत वाढ होण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

